अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक : अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. १७ एप्रिल २०२५ | वर्ष १० वे | अंक ३६ वे | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# नगराध्यक्षांना हटविण्याचा अधिकार आता सदस्यांनाच

## अध्यादेश काढण्यास मंत्रिमंडळाची मान्यता

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील नगर परिषदा, नगर पंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचे अधिकार आता नगरसेवकांना बहाल करण्यात येणार आहे. यासाठी राज्यात सध्या कार्यरत असलेल्या १०५ नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरींसाठी हा निर्णय लागू असणार आहे. त्यासाठी तातडीने अध्यादेश काढून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणेनुसार नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार निवडून आलेल्या नगरसेवकांना असणार आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवता येईल. त्या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरून बाजूला सारण्याचा प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर ही कार्यवाही करून नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात होती.

आता राज्य सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षांत संपत आहे.

******

### निवडणुका लवकरच होणार...

**दरम्यान, राज्य सरकारने नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा केली. या सुधारणेसोबतच रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लवकर घेण्याची लगबग सुरू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यावर्षी दिवाळीनंतर या निवडणुका लागण्याची शक्यता आहे. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लवकर घेण्याची मागणी स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, नेत्यांकडून केली जात आहे.**

# शिक्षण हा संवैधानिक अधिकार : पद्मश्री लक्ष्मण माने

ब्रम्हपुरी/का.प्र.

"कमी पटसंख्येचा बहाणा करून राज्य शासनाने राज्यातील जवळपास १४ हजार प्राथमिक शाळा बंद करण्याचे षडयंत्र रचले आहे. बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा हा कुटील डाव आहे. शासनाचे हे षडयंत्र सर्वशक्तीनिशी हाणून पाडले पाहिजे. शिक्षण हा प्रत्येकाचा संवैधानिक अधिकार आहे आणि तो प्रत्येकाला मिळालाच पाहिजे, कारण शैक्षणिक क्रांतीतूनच सामाजिक क्रांतीचा मार्ग सुकर होतो." असे बहुमोल विचार पद्मश्री तथा



डॉ. लक्ष्मण माने संबोधित करतांना...

'उपरा' हया जगप्रसिध्द आत्मकथेचे लेखक डॉ. लक्ष्मण माने यांनी व्यक्त केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीने आयोजित समारंभात अध्यक्ष पदावरून बोलत होते. दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक लक्ष्मण यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रसंगी मंचावर समितीचे अध्यक्ष अशोक रामटेके, उपाध्यक्ष सुधीर अलोने, कोषाध्यक्ष के.जी. खोब्रागडे, सचिव डॉ. युवराज मेश्राम, नेताजी मेश्राम, छाया जांभुळे, सुधाकर पोपटे प्रामुख्याने उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, ब्राम्हणवाद्यांनी बहुजनांना शिक्षणाचा अधिकार नाकारला. महात्मा ज्योतिबा फुले तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतोनात संघर्ष करून बहुजनांसाठी शिक्षणाची दारे उघडली. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय ही मानवी मुल्ये शिक्षणाच्या माध्यमातूनच प्रत्यक्षात साकार होऊ शकतात. हीच मानवी मुल्ये राज्यघटनेचे अमूल्य अंग आहेत. म्हणून बहुजनांनी डॉ. आंबेडकरांचा आदर्श ठेवला पाहिजे.

**डॉ. लक्ष्मण यादव** यांनी सामाजिक क्रांतीचा इतिहास कथन केला. तथागत गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा फुले, संत रविदास यांचा वारसा पुढे नेत डॉ. आंबेडकरांनी सामाजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवली. अर्थसंकल्पात शिक्षणासाठी २.६ टक्के एवढी अत्यल्प तरतूद करून शासनाने शिक्षणाची खिल्ली उडविल्याचा आरोप त्यांनी राज्यकर्त्यांवर केला. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा ही डॉ. आंबेडकरांची शिकवण प्रत्येकाने अंगिकारली पाहिजे. अस्पृश्यांना जगण्याचे अधिकार डॉ. आंबेडकरांनी मिळवून दिले, याची आठवण त्यांनी करून दिली.

या प्रसंगी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशूवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे यांना वन्यजीवांविषयी सेवाकार्याबद्दल रोख २५ हजार रूपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केल्याबद्दल गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक रामटेके यांनी केले. डॉ. युवराज मेश्राम यांनी संचालन तर सुधीर अलोने यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला श्रोतृवर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.



## संपादकीय...

# यूपीआय ठप्प!

देशात दैनंदिन आर्थिक व्यवहारासाठी अत्यंत सहजपणे वापरली जाणारी यूपीआय पेमेंट यंत्रणा दोन दिवसांपूर्वी म्हणजेच शनिवारला काही तांत्रिक कारणामुळे अचानक आणि दीर्घकाळ बंद पडल्यामुळे हजारो लोकांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले. जी गैरसोय त्यांना सोसावी लागली त्यामुळे पुन्हा एकदा 'डिजिटलइंडिया' या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांच्या कालावधीमध्ये तिसऱ्यांदा अशा प्रकारची घटना घडल्यामुळे 'डिजिटलइंडिया'चा गवगवा एकीकडे सुरू असताना दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांना जो त्रास सहन करावा लागत आहे त्याचा विचारही करण्याची गरज आहे.

याआधी २६ मार्चला आणि त्यानंतर २ एप्रिलला सुद्धा अशाच प्रकारे यूपीआय सेवा ठप्प झाली होती. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये सातत्याने सर्वसामान्य नागरिक सुद्धा यूपीआयच्या माध्यमातून दैनंदिन आर्थिक व्यवहार करत आहेत. कोणत्याही मोठ्या किंवा छोट्या शहरात पदपथावर एखादी चहाची गाडी असेलकिंवा वडापावची गाडी असेलकिंवा साधा चहाचा ठेला जरी असेलतरी त्या ठिकाणीसुद्धा १० रुपयाच्या चहासाठी किंवा २० रुपयाच्या रसासाठी पेमेंट करताना यूपीआयचा वापर केला जातो. या पेमेंट पद्धतीच्या लोकप्रियतेमुळे आणि सुलभतेमुळे सर्वसाधारण नागरिकांपैकी बहुतांशी लोक आता खिशात जास्त रोख रक्कम बाळगत नाहीत.

पेमेंट करणारा आणि पेमेंट घेणारा दोघांच्याही सोयीचा हा व्यवहार असल्यामुळे गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये ही सर्वात लोकप्रिय आर्थिक व्यवस्था झाली आहे. एका आकडेवारीनुसार भारतात दररोज ५० कोटी लोक यूपीआयचे व्यवहार करतात आणि त्याच्या एकंदर व्यवहाराचा आकडा अब्जावधी रुपयांमध्ये येतो. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतातील५० कोटी लोक जर दररोज नियमितपणे यूपीआय प्रणाली वापरत असतीलतर ही प्रणाली विस्कळीत झाल्यावर काय गैरसोय होवू शकते, याचा अंदाजच करायला नको. सध्या लग्नसराईचे दिवस आहेत आणि सर्वसाधारणपणे लग्नाची खरेदी करताना जो व्यवहार होतो तो रोख न होता, अशाप्रकारे यूपीआयच्या माध्यमातूनच केला जातो.

मोठी रोख रक्कम बाळगणे सुरक्षित नसल्याने खरेदीचे मोठे व्यवहार यूपीआय पेमेंटच्या माध्यमातूनच केले जातात. पण या शनिवारी किंवा त्यापूर्वी दोन वेळा यूपीआय यंत्रणा ठप्प झाली तेव्हा हे सर्व व्यवहारही विस्कळीत झाले. ऐनवेळी एटीएम कार्डचा वापर करून एटीएममधून पैसे काढणे किंवा चेक देऊन व्यवहार पूर्ण करणे अशा प्रकारचा पर्याय अनेक लोकांना स्वीकारावा लागला. मोठमोठे मॉलकिंवा मोठमोठ्या दुकानांमध्ये किंवा उन्हाळ्याचा हंगाम असल्यामुळे इलेक्ट्रॉनिक दुकानांमध्ये जेव्हा खरेदीसाठी लोक गेले असतील, तेव्हा पेमेंट करताना अनेकांची गैरसोय झाली असेल. अनेकदा यूपीआय यंत्रणाच ठप्प झाल्यानंतर त्या दिवशीचा व्यवहार करणे शक्य होत नाही. शिवाय मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागते. ज्याप्रकारे यूपीआय पेमेंट पद्धती विस्कळीत झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागतो त्याच प्रकारे अनेक वेळा जर सरकारी उपक्रमांच्या वेबसाइट्स किंवा ॲप्स यामध्ये सुद्धा विस्कळीतपणा आला तर सर्वसामान्य नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागतो. सरकारी सेवांचा उपभोग घेण्यासाठी अर्ज करण्यासाठी डिजिटलमाध्यमांनाच आता प्राधान्य दिले जाते. अनेक वेळा या सरकारी वेबसाइट किंवा सरकारी ॲप्सच्या कार्यप्रणालीमध्ये अनेक दोष असतात त्याचा फटकाही अनेकांना बसतो. डिजिटलइंडिया या घोषणेच्या माध्यमातून मोदी सरकारने गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये सर्व व्यवहार ऑनलाइन पद्धतीने व्हावेत यासाठी जरी पुढाकार घेतला असला, तरी तांत्रिक पातळीवरीलपुरेसे पाठबळ अद्यापही या व्यवस्थेला मिळालेले नाही हेच यूपीआय व्यवस्था सलग तिसऱ्यांदा ठप्प झाल्याने लक्षात येत आहे.

# पायल सहारे हिची इंडियन आर्मीमध्ये निवड



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगाव (खुर्द) येथील पायल शांताराम सहारे हिची वयाच्या १९व्या वर्षी इंडीयन आर्मीमध्ये निवड झाली आहे. तोरगाव खुर्दच्या शिरपेच्यात मानाचा तुरा, कोर ऑफ मिलिटरी पोलीस मध्ये निवड होणारी जिल्ह्यातून पहिलीच मुलगी असून वडील शांताराम शेतकरी तर आई गृहिणी आहे. आपल्या ब्रह्मपुरी परिसरामध्ये पायलने आपल्या निवडीमुळे इतरही मुलींना आर्मी बद्दल प्रेरित केले आहे.

बालपणापासूनच हुशार आणि खेळाडू वृत्तीची असलेल्या पायलने देशसेवेसाठी आपला मार्ग निवडला. आर्मीमध्ये निवड झाल्यानंतर पायलने आपली यशाचे श्रेय लेफ्ट. अभिजीत परकरवार सर २० महाराष्ट्र बटालियन नेवजाबाई हितकारणी महाविद्यालय ब्रह्मपुरी आणि आपल्या आई-वडिलांना दिले आहे. सैनिक पायल ही एनसीसी कॅडेट असून बीए च्या द्वितीय वर्षाला शिकत होती. तिने अशा पद्धतीने अभ्यास केला की पहिल्याच प्रयत्नात यशाला गवसणी घातली. मुला मुलींमध्ये आता पायलने अवघ्या १९ वर्षांत यश गाठले. विशेष म्हणजे पायलने अवघ्या १९ व्या वर्षात या यशाला गवसणी घातली आहे. त्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने समता रॅली उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतिने महामानव



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बाईक व कार रॅली काढण्यात आली.

ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रातील त्रिरत्न बुध्द विहार, सम्राट अशोक चौक, गुजरी वार्ड, पेठवार्ड, देलनवाडी, धम्मभूमी, बोंडेगाव, कुर्झा, वाल्मिक नगर येथील बुध्द विहारांना भेटी देत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याना रॅलीद्वारा समितीचे अध्यक्ष व रिपाई नेते अशोक रामटेके यांचे नेतृत्वात अभिवादन करण्यात आले. रॅलीत बहुसंख्येने भीमसैनिक सहभागी झाले होते. रॅलीचा समारोप पंचशील एज्युकेशन सोसायटीच्या मैदानावर करण्यात आला. यावेळी उपस्थित नागरिकांना अशोक रामटेके यांनी संबोधित करून आभार मानले. त्यानंतर सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.

रॅली यशस्वी करण्यासाठी समितीचे उपाध्यक्ष सुधीर अलोने, सचिव डॉ.युवराज मेश्राम, सहसचिव सुधाकर पोपटे, कोषाध्यक्ष के.जी.खोब्रागडे, संघटक नेताजी मेश्राम, महिला संघटक छाया जांभूळे यांच्यासह आसाराम बोदेले, जगदीश मेश्राम, बौद्धरक्षक जांभूळकर, डी.एम.रामटेके, दिनेश लोखंडे, नरेंद्र बांते, आनंद गणवीर, राजू मेश्राम, सरीताताई खोब्रागडे, मंगला फुले इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

# तुलानमाल शाळेत निरोप समारंभ संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलानमाल येथे वर्ग आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळा समितीचे अध्यक्ष कालिदास ठाकरे, प्रमुख अतिथी सरपंच राजकुमार कुतरमारे, उपाध्यक्ष डाकरेस्वर बगळे, सदस्य सुनीता हानवते, अण्णाजी नागपुरे, प्रियांका मडावी, उज्ज्वला चहांडे, दुर्गा कार उपस्थित होत्या.

सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला हार घालून, दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्वागतगीत, पाहुण्यांचे स्वागत, अतिथीचे मनोगत, विद्यार्थी यांचे मनोगत झाले. प्रास्ताविक कुंभारे सर यांनी तर संचालन दिप्ती शेंद्रे हिने केले. कार्यक्रमाला जगदीश मेहेर, अशोक नागोशे, बोकडे, चंद्रशेखर चौधरी, नीलिमा यावलकर उपस्थित होते.

## विनोदिनी

एक नवविवाहित जोड़ा बर्तन की दुकान में झगड़ रहा था।
पत्नी- ये वाला स्टील का गिलास लो।
पति- नहीं, ज़रा और बड़ा गिलास लेंगे' !
तभी दुकानदार बोला - 'साहब जी, महिला दिवस भले ही चला गया है, लेकिन मैडम जो कह रही हैं, वही गिलास ले लीजिए ना...''
पति - 'अरे भैया तुम्हें बेचने की पड़ी है लेकिन इस छोटे से गिलास में मेरा हाथ घुसता नहीं है, मैं इसे मॉंजूगा कैसे ?'
यह सुन दुकानदार की आंखो मे आंसू आ गये।

# ने.भै.हि. शिक्षण संस्थेच्या १५० कर्मचाऱ्यांनी केली नेत्र तपासणी

## नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबीर



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी तथा अशोक नेत्रालय, ब्रम्हपुरीच्या संयुक्त विद्यमाने नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील स्व.हिरालालजी भैया सभागृहात नुकताच निशुल्क नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आला.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया, संस्थेचे सचिव अशोक भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे, उपप्राचार्य डॉ.एस.एम.शेकोकर, शांताबाई भैया महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एस. वरभे, ने.हि.उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कपूर नाईक सर, निखारे सर, उपमुख्याध्यापक अनिल नाकाडे तथा नेत्र तपासणीसाठी उपस्थित डॉ. रोहिणी कवठे संचालक अशोक नेत्रालय ब्रम्हपुरी, स्नेहल कवठे व त्यांची चमू इत्यादी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर डोळ्यांची निगा कशी राखायची? डोळ्यात बिघाड झाल्यास कोणती उपाययोजना करायची? संगणक व मोबाईलचा नेत्रावर झालेला परिणाम यावर मान्यवर पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

उपस्थित सर्व कर्मचा-यांच्या नेत्र तपासणी शिबिराला सुरुवात करण्यात आले. यात नेत्र तपासणीसाठी ने. हि.महाविद्यालय, शांताबाई भैया महिला महाविद्यालय, ब्रम्हपुरी, ने. हि. मुलांची शाळा, ने. हि. कन्या विद्यालय व एल. एम. बी. पब्लिक स्कूल, येथील प्राध्यापकवृंद, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भाग घेत १५० जणांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली.

कार्यक्रमाचे संचालन उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. धनराज खानोरकर यांनी केले. या शिबिरासाठी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था कर्मचारी व अशोक नेत्रालयातील चमूने मोलाचे सहकार्य केले.

# विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

## संविधान अवताडे प्रथम, पुजा विर द्वितीय तर योगेश सिडाम तृतीय



ब्रह्मपुरी/का.प्र.

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ब्रम्हपुरी येथील आंबेडकर विचारधारा विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भारतीय लोकशाहीचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर’ या विषयावर विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित एन.एच. कॉलेज ब्रह्मपुरी, कर्मवीर महाविद्यालय मूल, गोविंदराव वारजुकर आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज नागभिड, गंगाबाई तलमले कॉलेज ब्रह्मपुरी, जनता महाविद्यालय चंद्रपूर, डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार रात्र पाळी कॉलेज चंद्रपूर, कर्मवीर महाविद्यालय मूल, श्री सद्गुरु साईबाबा सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आष्टी, चिंतामणी कॉलेज, घुग्घुस आणि इतर महाविद्यालयातीलविद्यार्थी संघानी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला. स्पर्धेचे परिक्षण ब्रम्हपुरी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय रामटेके, ज्येष्ठ पत्रकार विजय मुळे आणि लेफ्टनंट सरोज शिंगाडे यांनी केले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक चिंतामणी कॉलेज, घुग्घुस येथील बी.कॉम. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी संविधान शरद अवताडे याने प्राप्त केला. द्वितीय पारितोषिक सरस्वती जयरामजी तर्वेकर महिला कॉलेज, नागभिड येथील बी.ए. प्रथम वर्षाची पूजा कृष्णाजी विर या विद्यार्थिनीने प्राप्त केला. तर तृतीय पारितोषिक कर्मवीर महाविद्यालय, मूल येथील बी.कॉम. तृतीय वर्षाचा विद्यार्थी योगेश अरुण सिडाम यांनी प्राप्त केला.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा .तुफान अवताडे यांनी केले.

# वायगाव येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण

## आम. विजय वडेट्टीवारांचे हस्ते लोकार्पण

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील वायगाव येथे विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक सभागृहाची आवश्यकता होती. या संदर्भात वायगाव येथील नागरिकांनी माजी मंत्री, आमदार विजय वडेट्टीवार यांची भेट घेऊन सामाजिक सभागृह बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. तेव्हा आमदार विजय वडेट्टीवार यांनी सदर सामाजिक सभागृहाच्या बांधकामांसाठी विशेष प्रयत्न करून निधी उपलब्ध करून दिला.

सदर सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून सभागृहाचे लोकार्पण माजी मंत्री, आमदार विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते संपन्न झाले



यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, जिल्हा काँग्रेस कमीटीचे उपाध्यक्ष मोंटु पिलारे, युवक काँग्रेसचे विधानसभा उपाध्यक्ष अमित कन्नाके, अनुसूचित जाती सेलचे विधानसभा अध्यक्ष प्रकाश खोब्रागडे यांसह गावातील मान्यवर उपस्थित होते.

# बुध्दगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समर्थनार्थ

## वंचितच्या पदाधिकाऱ्याची अनोखी स्वाक्षरी मोहिम



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी येथे बौद्ध मंगल परिणयाला उपस्थित राहुन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा आयटी सेलप्रमुख लिलाधर वंजारी यांनी अनोख्या पध्दतीने स्वाक्षरी मोहिम राबविली.

बुध्दगया येथे सुरु असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ तसेच वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौध्द महासभा यांच्या वतीने सुरु असलेल्या स्वाक्षरी मोहिमेला बळ देण्यासाठी हि अनोखी पध्दत राबविण्यात आली. यावेळी वर प्रजोत तेलंग व वधु शताब्दी सेवक देवगडे यांनी या आंदोलनाच्या समर्थनार्थ स्वाक्षरी करुन आपले सामाजिक दायित्व व कर्तव्य पुर्ण केले. शिवाय यावेळी शेकडो बौध्द बांधवांनी स्वाक्षरी करुन महाविहार मुक्ती आंदोलनास पाठींबा जाहीर केला. यावेळी उपस्थितांनी वंचितच्या या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: अंक व जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

# ब्रम्हपुरी तालुक्यात विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यात विविध संस्था, शाळा व सामाजिक संघटनांच्या वतीने सोमवारला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्य विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**एल. एम. बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी -** येथे सोमवार दिनांक १४ एप्रिल २०२५ला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम पार पडला.

शाळेच्या वतीने प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी शाळेच्या पर्यवेक्षिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी -** येथे बोधिसत्व, महामानव, दीन-दुबळयांचे कैवारी, थोर अर्थशास्त्रज्ञ, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सोमवार, दिनांक १४ एप्रिल२०२५ रोजी मोठ्या उत्साह, अभिमान आणि आदरभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक कपूर नाईक सर होते. उपमुख्याध्यापक ए.डब्ल्यू. नाकाडे सर आणि पर्यवेक्षक पि.आर. जिभकाटे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. नाईक सरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बोरकर सर यांनी प्रभावीपणे पार पाडले. कु. तुलेश्वरी बालपांडे मॅडम यांनी सर्व मान्यवरांचे, शिक्षकवृंदांचे व उपस्थितांचे मन:पूर्वक आभार मानले. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**चौगान -** तालुक्यातील चौगान येथे फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच तथा बौद्ध समाज चौगान यांच्या वतीने ‘भीम जन्मोत्सव उत्सव समतेचा’ या संकल्पनेतून राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी चंद्रपूर येथील सुप्रसिद्ध गायक सुशांत मानकर आणि त्यांच्या संच यांनी सादर केलेल्या ‘भीमराया घे तुझ्या या



लेकरांची वंदना’ या बुद्ध-भीम गीतांच्या प्रबोधनात्मक संगीतमय कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमूरकर यांच्या हस्ते संपन्न झाले. सह-उद्घाटक म्हणून चौगानचे सरपंच उमेश धोटे, अध्यक्षस्थानी उपसरपंच प्रा. अंकुश मातेरे, तर उपाध्यक्ष म्हणून पत्रकार प्रा. संतोष पिलारे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मयुर शिवणकर यांनी केले. चौगान ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, बौद्ध समाज आणि रमाई महिला मंडळ चौगान यांच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

**नेवजाबाई हितकारिणी कन्या विदयालय, ब्रम्हपुरी -** स्थानिक ने.ही. कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका दलाल मॅडम, हटवार मॅडम, बारेकर सर मंचावर उपस्थित होते.

यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीत श्री शिवूरकर सर व कु. हटवार मॅडम यांच्या चमू ने सादर केले. प्रास्ताविकात ठेंगरी सर यांनी घराघरात संविधान पोहोचवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम यांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून अभ्यासाभिमुख बनण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ठेंगरी सरांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन धोटे सर यांनी केले.

**डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंट, ब्रम्हपुरी -** बोधिसत्व ,विश्वरत्न, भारतरत्न ,भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती श्री श्रावणजी बगमारे शिक्षण संस्था ब्रह्मपुरी द्वारा संचालित डॉ पंजाबराव देशमुख कान्वेंट आणि डॉ पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली .

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रकाश बगमारे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना वंचित आणि वर्षानुवर्षापासून ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांच्या विकासाचा मार्ग बाबासाहेबांच्या विचारातच आहे आणि म्हणून सर्वांनी त्यांचे विचार अंगीकारून त्यावर कृती करून समाजाचा, राष्ट्राचा आणि मानव जातीचा कल्याण करण्यासाठी विचार करावा असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष तथा कॉन्व्हेंटच्या प्राचार्य मनिषा बगमारे, कॉलेजच्या प्राचार्या शारदा ठाकरे आणि सर्व प्राध्यापक ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. सुभाषचंद्र खोब्रागडे यांनी तर उपस्थितांचे आभार गोवर्धन दोनाडकर यांनी मानले.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी -** मा. सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर यांच्या निर्देशानुसार स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ब्रह्मपुरी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्ताने १८ तास अभ्यास अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था चांदाचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी या अभियानाचे उद्घाटन केले. याप्रसंगी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ - १८ तास अभ्यास केला त्या पासून आपण सर्वांनी प्रेरणा घेऊन १८ तास वाचनाचा नुसता संकल्पच नव्हे तर प्रत्यक्षात त्या संकल्पाला मूर्त रूप देऊ या असे भाष्य करून अभियानात स्वत: सहभागी होऊन विद्यार्थी आणि प्राध्यापकाना शुभेच्या दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार ग्रंथालय विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. उमेश हरडे यांनी केले.

**विदर्भ इस्टेट -३ कॉलनी -** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम महामानवाला अभिवादन करण्यात आले, भीमजयंती सोहळयाच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून धनंजय मेश्राम सर, उदघाटक मुन्नी शेंडे मॅडम, मार्गदर्शक अॅड. आशिष गोंडाने, संजय वाळके सरउपस्थित होते तर विशेष अतिथी म्हणून प्रकाश लांजेवार सर, रतन चहांदे सर, प्रशांत मेश्राम सर, प्रविण बन्सोड सर, छन्ना खोब्रागडे सर, घनश्याम कुळमेथे सर, प्रमोद बन्सोड सर, प्रमोद बोरकर सर, सुमेध लोखंडे सर, गावलकर सर, कोचे सर, सतिश बागडे सर, हिरालाल चौधरी सर, संजय गावलकर सर मंचावर उपस्थित होते.

भिमजयंती निमित्त भाषण स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, तळयात-मळयात स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, चमचा गोळी, संगीत खुर्ची, एकलव सामूहिक नृत्य, गीतगायन स्पर्धा इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्य स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक देऊन मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत मेश्राम सर यांनी, सूत्रसंचालन पुण्यवता सुनिल मेश्राम यांनी तर उपस्थित सर्वांचे आभार अपर्णा प्रशांत मेश्राम हिने

# मंगेश गोवर्धन यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार

ब्रह्मपुरी/का. प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगाव खुर्द व बेलगाव जाणी ग्रामपंचायत अधिकारी मंगेश विजय गोवर्धन यांना सन २०२३-२०२४ चा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे.



महाराष्ट्र राज्य शासनातर्फे जिल्हा परिषद स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांना शासन स्तरावरून यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कार सोहळयात दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. नागपूर विभागातून, चंद्रपूर जिल्ह्यातून मंगेश विजय गोवर्धन यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्हा परिषद स्तरावर अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांना शासनाच्या स्तरावर यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार सन २०२३-२४ या वर्षाकरिता आदर्श ग्रामपंचायत अधिकारी यांची निवड शासनाकडून जाहीर कण्यात आली आहे. ग्रामविकास मंत्री यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# खंडणी वसूल करणाऱ्या 'त्या' दोघांवर गुन्हा नोंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

बैल बाजारातून बैलजोडी खरेदी करून वाहनाने आपल्या स्व गावी नेत असतांना, मालवाहतूक गाडी अडवून धमकी देत खंडणी वसूल करणाऱ्या शहरातील नामांकित खासगी बँकेतील 'त्या' दोन कर्मचाऱ्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी भुजंगराव नागपूरे वय ४२ हे बोंडाळा बु. ता. मूल येथील रहिवासी आहेत. त्यांचा बैल खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. दि.३० मार्च २०२५ ब्रम्हपुरीत बैलबाजारात फिर्यादी यांनी बापू भोयर सहकाऱ्यासोबत बैलजोडी विकत घेतली. फिर्यादी सदर बैलजोडी मालवाहतूक गाडीतून गावाकडे गांगलवाडी पाथरी मार्गे जात असतांना, गांगलवाडी तळ्याजवळ ग्रे रंगाच्या जीपने त्यांचा रस्ता अडविला. सदर ग्रे रंगाची जीपवर जप्ती वसूली पथक, ब्रम्हपुरी अर्बन को ऑप बँक अशा आशयाचे बॅनर व जीप क्रमांक एम.एच.३४ एए५५१२ असे लिहिले होते.

त्यातील आरोपी देवराव नवघडे राह. ब्रम्हपुरी व आरोपी विनोद उपासे यांनी फिर्यादी व सहकाऱ्याकडून दोन हजार रूपयांची मागणी करून धमकाविले. परंतु फिर्यादीने आम्ही कास्तकार असून, दोन हजार रूपये न देता, दोनशे रूपये दिले. सदर प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर फिर्यादी यांनी याप्रकरणी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरूद्ध तक्रार दाखल केली. आरोपी देवराव नवघडे व आरोपी विनोद उपासे यांच्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२६ (२), ३०८ (२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ब्रम्हपुरीत जिजाऊ रथयात्रेचे भव्य स्वागत




ब्रम्हपुरी/का.प्र.

समाजातील समता, बंधुता आणि न्यायाच्या आदर्शांची भावना दृढ करणारी जिजाऊ रथयात्रा महाराष्ट्रभर धाव घेत आहे. या रथयात्रेचा ब्रम्हपुरीत शनिवार, १२ एप्रिल रोजी उत्साहात आणि श्रद्धेने स्वागत करण्यात आले. यात्रेच्या रथात राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे दर्शन घेण्यासाठी नागरिक, सामाजिक संस्था आणि विविध गट एकत्र आले.

ढोल-ताशांच्या गजरात रथयात्रेचा ब्रम्हपुरी शहरात स्वागत करण्यात आले. या रथयात्रेचे आयोजन मराठा सेवा संघाने केले आहे. ही यात्रा १८ मार्च २०२५ रोजी वेरूळ (शहाजी राजे भोसले यांचे जन्मस्थळ) येथून सुरु झाली असून, ०१ मे २०२५ रोजी पुण्यातील ऐतिहासिक लालमहालात तिचा समारोप होणार आहे. या यात्रेचा मुख्य उद्देश समाजातील एकता, स्त्रीशक्तीचा गौरव आणि राजमाता जिजाऊंच्या कार्याचे स्मरण करणे हा आहे. ही यात्रा समाजमनात एकतेची व समतेची मशाल पेटवत आहे. खाजगीकरण, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, भ्रष्टाचार, महागाई अशा असंख्य प्रश्नांनी ग्रासलेल्या जनतेला धर्मांधतेच्या चक्रात अडकवण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव जिजाऊ रथयात्रा उघड करत आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात प्रवेश केल्यानंतर निलज, रुई, किन्ही आणि पारडगाव येथील गावकऱ्यांनी पारंपरिक भजन दिंडीसह यात्रेचे स्वागत केले. ब्रम्हपुरी शहरातील मुख्य रस्त्यावर मिरवणूक काढली गेली आणि या वेळी प्रियदर्शिनी इंदिरा गांधी, संत गाडगेबाबा, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी तसेच जगतगुरू तुकाराम महाराज यांच्या स्मारकांना भेट देऊन माल्यार्पण करण्यात आले.

रथयात्रेच्या भव्य स्वागतासाठी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, शिवछत्रपती फाउंडेशन आणि इतर सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. ब्रम्हपुरीतील दानशूर व्यक्तींनी देखील यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य दिले.

# ब्रम्हपुरीत मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

समाजात मानसिक आरोग्याबद्दल जाणीव जागृती व योग्यवेळी उपचार मिळावा म्हणुन जे.जे. मेडीकल्स ॲण्ड मल्टीस्पेशालिटी क्लिनिकच्या वतीने ब्रम्हपुरी येथे दि. १३ एप्रिलला मोफत मानसिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरात नागपूर चे सुप्रसिद्ध न्यूरो सायकीयाट्रिस्ट व अल्कोहोल व्यसनमुक्ती तज्ञ डॉ. प्रणव पोहाने यांनी उपस्थित रूग्ण, नातेवाईक व जनतेला मार्गदर्शन केले.

शिबिरात १०० हून अधिक रुग्णांची मोफत तपासणी, मार्गदर्शन व औषधोपचार करण्यात आले. विशेषत: मानसिक तणाव, नैराश्य, चिंता, झोपेची समस्या, अल्कोहोल व्यसन, लैंगिक समस्या व इतर मानसिक समस्यांवर मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनामागे महत्वाचा वाटा असलेले जे.जे. मल्टीस्पेशालिटी क्लिनिक ॲण्ड मेडिकल्सचे संचालक प्रतीक कोहळे यांनी समाजात सकारात्मक बदल घडवुन आणण्याच्या दृष्टीने भविष्यातही अशी शिबिरे आयोजित करत राहण्याचा मानस व्यक्त केला.

# नोकरीचे आमिष देऊन ५.५ लाखांनी आर्थिक फसवणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागपूर येथे तुमच्या मुलीला सरकारी नोकरी लावून देतो म्हणून, सेवानिवृत्त कर्मचारी दोघांनी आर्थिक फसवणूक केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. आर्थिक फसवणूक करणाऱ्या त्या दोघांविरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी यशवंत शेंडे हे अड्याळ जाणी येथील रहिवासी आहेत. त्यांची मुलगी सन २०२१ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक म्हणून खासगी शाळेत नोकरी करीत होती. तिथे आरोपी विनोद मेश्राम राह. भूज याची बहिन नोकरी करीत असल्यामुळे त्यांचा परिचय होता. आरोपी विनोद मेश्राम याने फिर्यादीने त्यांच्या मुलीला कनिष्ठ लेखापाल एअरलाईन ॲथॉरीटी ऑफ इंडिया येथे नोकरी लावून देतो म्हणून आरोपी मनोज दादाजी मरसाळे रा. नवेगाव यांच्याशी ओळख करून दिली. आरोपी मनोज मरसाळे हे पायलट म्हणून काम करीत असून त्यांच्या ओळखीने तुमच्या मुलीला सहाय्यक व्यवस्थापक म्हणून नोकरी लावण्यासाठी १० लक्ष रूपयांची मागणी केली. मुलीच्या नावाने ऑफर लेटर आणून सहाय्यक व्यवस्थापक म्हणून नौकरी लागल्याचे भासविले. मुलीच्या नावाने ऑफर लेटर आणून सहाय्यक व्यवस्थापक म्हणून नौकरी लागल्याचे भासविले. फिर्यादीने चेक द्वारे आरोपींच्या खात्यात रक्कम वळती केली. विमानतळाजवळील द ट्रावोटेल सुट्स नावाच्या हॉटेलमध्ये फिर्यादीच्या मुलीला जॉईनींग प्रक्रियेसाठी बोलवून कसल्याही प्रकारची नियुक्ती न करता परत पाठविले. फिर्यादीने मुलीच्या नोकरीबाबत आरोपींना विचारणा केली असता, त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नोकरी मिळत नसल्या कारणामुळे फिर्यादि शेंडे आरोपींना वेळोवेळी पैसे परत मागीतले असता, ऑनलाईन स्वरूपात ४.५ लक्ष रूपये दि.०४ फरवरी २०२४ पर्यंत परत केले. परंतु उर्वरीत ५.५लक्ष रूपये देण्यासाठी आरोपी विनोद मेश्राम व आरोपी मनोज मरसाळे टाळाटाळ करीत असल्यामुळे फिर्यादि शेंडे यांनी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात दोघांविरूद्ध तक्रार दाखल केली.

आरोपी विनोद मेश्राम व आरोपी मनोज मरसाळे यांच्या विरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...
थोड्याच अवधीनंतर
ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper
प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**... QUOTES ...**

"Live as if you were to die tomorrow. Learn as if you were to live forever."
- Mahatma Gandhi

**चारोळी**

चुका करण्याचा प्रश्नच नाही
कधी नाही केले कोणतेच काम...
त्यांचा सातबारा कोरा म्हणून,
करा स्वच्छ चारित्र्याचा सन्मान...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

Nevjabai Bhaiya Hitkarini Education Society's

**LMB Public School, Bramhapuri**

**Tah. Bramhapuri, Dist. Chandrapur**

Affi.No. 1130674 Govt. Recognized No. 3068.2014

Udise No. : 27131111830 Mob.No. 7083840564

**WE'RE HIRING**

**[JOIN OUR TEAM]**

Applications are invited for the following posts at LMB Public School (Self-finance, CBSE School) Bramhapuri till 19th April 2025, 12 noon in school office. Applications won't be accepted after this date.

| Sr.No. | Name of post | Requirement | Qualification |
|---|---|---|---|
| 1. | Music Teacher | Vocal + Instrumental Knowledge | Sangeet Visharad |

Experienced persons will be preferred. The Candidate must submit all relevant certificates & Mark sheets along with recent passport size photograph.


Candidates can also submit their resume on Email ID : lmbpublicschool@gmail.com

President Mr. A.K. Bhaiya

Director Mrs. Ashita G. Bhaiya

Principal Mr. K.W. Qureshi

**Miracle constructions & Developers**



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

**सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स**





गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर

नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# विकासकामांच्या नावाखाली शहरातील रस्त्यांचे वाजले तीन-तेरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात भूमीगत गटर योजनेचे काम सुरू आहे. यासाठी रस्त्यावर खोदकाम करण्यात येत आहे. नगर पालिकेने नुकतेच अनेक विभागात रस्ता बांधकाम केले. आता हेच रस्ते पुन्हा खोदून भूमीगत गटारासाठी पाईप टाकण्यात येत आहे. त्यामुळे अनेक वार्डातील रस्त्याचे तीन तेरा वाजले असून, आवागमणास सर्वसामान्य नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

शहरात विकास कामाच्या नावाखाली अनेक कामे सुरू आहेत. ब्रम्हपुरी शहरात भूमीगत गटर लाईन योजनेचे काम सुरू आहे. त्यासाठी कंत्राटदाराकडून रस्त्याचे जेसीबी द्वारे खोदकाम करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच पालिकेने अनेक प्रभागात रस्त्याचे बांधकाम केले. मात्र, भूमीगत गटर लाईनच्या कामासाठी आता हेच बांधकाम केलेले रस्ते पुन्हा उखळण्यात आले आहेत. त्यामुळे नगर पालिकेचा रस्ता बांधकामासाठी वापरलेला निधी वाया जाणार असून हा जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे. रस्त्याचे खोदकाम गेल्यामुळे उखाळलेल्या रस्त्यावरून पायी चालतांना तारेवरची कसरत करीत मार्ग शोधावा लागत आहे. तर दुचाकीने रस्त्यावरून आवागमण करतांना, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय गटर लाईनचे काम रस्त्यावर दिवसभर चालत असल्यामुळे अनेक वार्डात रस्ते जाम झाल्याचे दिसून येते. शहराच्या विकासाच्या नावाखाली रस्ता बांधायचा, मग उखडून टाकायचा अन् पुन्हा बांधायचा असा निरर्थक प्रकार नगर पालिका हद्दीत पहावयास मिळत आहे. यामुळे सर्वसामान्यांचा कररूपी पैसा निरर्थक वाया जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या संचालिका आशिता भैया यांचा वाढदिवस उत्साहात संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या वतीने दिनांक १२ एप्रिल२०२५ ला नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या नुतन सदस्या व स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

वाढदिवसाच्या कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संगीत शिक्षक यांच्या Birthday गीताने झाली. गिताच्या माध्यातून त्यांना शुभेच्छा देऊन त्यांचे स्वागत केले गेले. कार्यक्रमप्रसंगी ने. हि. शिक्षण सस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य, सुपरवाईजर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वानी आशिता भैया मॅम यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

उत्साहापूर्ण कार्यक्रमात स्कुलच्या पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅम यांनी आपल्या काव्यातून आशिता भैया मॅडमच्या यशस्वी जीवनावर प्रकाश टाकला. यानंतर संचालिका आशिता मॅम यांनी आपले विचार व्यक्त केले. शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे कार्य मी यशस्वीरित्या पार पाडत आहे. व यापुढेही यशस्वी रित्या पार पाडणार. प्रत्येक कार्य करण्याकरिता मला प्रोत्साहित केले जाते असे म्हणत या संपूर्ण यशाचे श्रेय संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांना दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी आशिता भैया मॅम यांच्या हस्ते केक कापण्यात आले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अल्पोहार घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन पुजा हर्षे मॅडम यांनी केले.

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

**गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी**

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404